■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १९ ● अंक १ ● मंगळवार, दि. २६ मे ते २ जुन २०२६ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

# वाशिममध्ये अवैध इंधन साठेबाजीवर जिल्हा प्रशासनाची कारवाई

**वाशिम, दि. २३ मे (जिमाका) जिल्ह्यात अवैध आणि असुरक्षित इंधन साठवणुकीविरुद्ध प्रशासनाने अत्यंत कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. या धडक मोहिमेचा भाग म्हणून वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत महसूल आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने एक मोठी कारवाई केली. तोंडगाव फाटा येथील 'हॉटेल गावकरी' या ठिकाणी धाड टाकून बेकायदेशीररित्या साठवून ठेवलेला डिझेलचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे.**

## तोंडगाव फाट्यावरून १४० लिटर डिझेल जप्त



या प्रकरणी हॉटेल चालकाविरुद्ध अत्यावश्यक वस्तू कायद्यांतर्गत गंभीर गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील कायदेशीर प्रक्रियेला गती देण्यात आली आहे.

### गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई

ही कारवाई २२ मे २०२६ रोजी संध्याकाळी ६.४५ ते ८ वाजेच्या सुमारास करण्यात आली. तहसील कार्यालयातील प्रभारी निरीक्षण अधिकारी गजानन दत्तात्रय सोनार यांना ग्राम महसूल अधिकारी रवींद्र वैनुले यांच्याकडून तोंडगाव फाटा जवळील 'हॉटेल गावकरी' येथे अवैध डिझेल साठा असल्याची खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पुरवठा निरीक्षक अनिता सुभाष देशमुख, पोलीस अंमलदार बन्सी चव्हाण आणि महसूल विभागाच्या पंचांसह पथकाने तात्काळ घटनास्थळी जाऊन तपासणी केली. हॉटेलची कसून झडती घेतली असता, तेथे एका निळ्या रंगाच्या ड्रममध्ये डिझेल साठवून ठेवल्याचे पथकाच्या निदर्शनास आले.

### अवैध साठा आणि कागदपत्रांची कमतरता

पथकाने तेथे हजर असलेल्या हॉटेल चालकाला त्याचे नाव विचारले असता, त्याने आपले नाव विलास राजाराम धाडवे (वय ४०, रा. तोंडगाव) असल्याचे सांगितले. या अवैध साठ्याबाबत पथकाने त्याच्याकडे खरेदी-विक्रीचा अधिकृत परवाना, साठवणूक नोंदवही, अधिकृत खरेदी बिल किंवा वाहतूक पास यांसारख्या कोणत्याही कायदेशीर कागदपत्रांची मागणी केली. मात्र, त्याच्याकडे एकही वैध कागदपत्र आढळून आले नाही. हा पेट्रोलियम साठा बेकायदेशीर रित्या, अत्यंत असुरक्षित आणि अनधिकृतपणे साठवून ठेवल्याचे सिद्ध झाल्याने पंचांसमक्ष त्याची मोजणी करण्यात आली. या ड्रममध्ये एकूण १४० लिटर डिझेल मिळून आले, ज्याचे बाजारमूल्य प्रति लिटर ९५.४६ रुपये दराने एकूण १३,३६४ रुपये ४ पैसे इतके आहे.

### तपासणी आणि गुन्हा दाखल

नियमानुसार, रासायनिक तपासणीसाठी या अवैध साठ्यामधून ७५० मिलीलीटरचे प्रत्येकी तीन नमुने काचेच्या स्वच्छ बाटल्यांमध्ये वेगळे काढण्यात आले. या नमुन्यांच्या बाटल्यांवर अधिकारी, पंच आणि आरोपीच्या स्वाक्षऱ्यांचे कागदी लेबल लावून ते जागच्या जागी लाखेने सीलबंद करण्यात आले. जप्त केलेला हा सर्व मुद्देमाल सुरक्षिततेच्या दृष्टीने वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आला आहे. या गंभीर बेकायदेशीर कृत्याची दखल घेत, तहसीलदार यांच्या अधिकृत आदेशानुसार प्रभारी निरीक्षण अधिकारी गजानन सोनार यांनी दिलेल्या लेखी फिर्यादीवरून विलास राजाराम धाडवे याच्याविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ७ अन्वये वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कारवाईदरम्यान उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार निलेश पळसकर उपस्थित होते.

जिल्ह्यातील कोणत्याही भागात अशा प्रकारे इंधनाची अवैध साठवणूक, साठेबाजी किंवा नफेखोरी करणाऱ्या नागरिक, व्यापारी किंवा पेट्रोल पंप चालकांवर यापुढेही अशीच कडक फौजदारी कारवाई केली जाईल, असा कडक इशारा वाशिम जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

## कागदी कपातील चहा देतोय कर्करोगाला निमंत्रण

### जागतिक चहा दिनी' रिसोडमध्ये पर्यावरण प्रेमींचा इशारा!



**रिसोड** : आजच्या आधुनिक युगातील लोकांनी मान्य केलेले महत्त्वाचे पेय म्हणजे चहा होय. मे महिन्यामध्ये चहाचे उत्पादन सर्वाधिक होते म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर २१ मे हा 'जागतिक चहा दिन' म्हणून घोषित केला गेला. आप्तस्वकियांमधील प्रेम द्विगुणीत करण्याकरिता चहा महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो हे तेवढेच खरे. त्यामुळे कमी साखर व मर्यादित स्वरूपात सेवन केलेला चहा मानसिकदृष्ट्या हितकारक आहे, असे मत पर्यावरण प्रेमी गजानन मुलंगे यांनी व्यक्त केले. आपल्या स्वतःच्या घरी आयोजित केलेल्या 'जागतिक चहा दिन' कार्यक्रमादरम्यान ते बोलत होते

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मदन चौधरी, श्रावणी बरडे, दिया बरडे, कावेरी मुलंगे, लक्ष्मी मुलंगे, माधवी मुलंगे, अरुणा थोरात, मंदा थोरात आणि नंदा गांजरे यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गुणवंत थोरात यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राजेश्वर मुलंगे यांनी मानले. चहा घ्या! पण चिनी मातीच्या किंवा काचेच्या कपामध्येच घ्या. आमचं ठरलं! आपणही ठरवा आणि रोगमुक्त व भयमुक्त जीवन जगा.' – गजानन मुलंगे, पर्यावरण प्रेमी

- बिस्फेनॉल-ए) नामक रसायनाचा उपयोग केला जातो. या कपामध्ये गरम चहा ओतल्यास हे रसायन चहामध्ये विरघळते आणि शरीरात शिरकाव करते. यामुळे कळत-नकळत आपण कर्करोगासारख्या (ऍहमी) गंभीर आजाराला

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रिसोडात घंटानाद आंदोलन

**रिसोड** : तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याच्या निषेधार्थ क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने २५ मे रोजी तहसील कार्यालय परिसरात घंटानाद आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

जलजीवन मिशन अंतर्गत तालुक्यातील गावांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा करावा, सन २०२६ चा पीक विमा तत्काळ मंजूर करावा, तसेच खताचा कृत्रिम तुटवडा होऊ नये यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, पोकरा योजनेत घोटा, हराळ, चिखली, व्याड व कवठा गावांचा समावेश करावा, कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांना लिलाव पट्टी उपलब्ध करून द्यावी, आणि सोलर कंपनीकडून प्रलंबित सोलर पंप तातडीने बसवावेत, अशी मागणी करण्यात आली. घरकुल लाभार्थ्यांना शासनाने जाहीर केलेली मोफत पाच ब्रास रेती द्यावी, शेतीकामांसाठी डिझेल उपलब्ध करून द्यावे तसेच खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर डीएपी खताचा पुरेसा साठा उपलब्ध करून बफर स्टॉक रिलीज करावा, अशी मागणीही करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे पाटील, युवा जिल्हाध्यक्ष सतीश इढोळे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सोनू मुळे, जिल्हा उपाध्यक्ष गजानन पैठणकर, तालुकाध्यक्ष तुकाराम बोडखे, मंगेश सरनाईक, अशोक पांडे, गजानन गायकवाड, अमोल मगर आदींची उपस्थिती होती. शेतकरी व नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला.



तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्याशी चर्चा करताना पदाधिकारी व कार्यकर्ते.

### अनुदान जमा करावे!

पंचायत समितीमार्फत घरकुल, विहीर, फळबाग, गोठा यांसारख्या योजनांचे रखडलेले अनुदान तातडीने जमा करावे तसेच पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांची होत असलेली कथित आर्थिक लूट थांबवावी.

**तसेच खत विक्रीतील अनियमितता रोखण्यासाठी कृषी केंद्रांची तपासणी करून लिंकिंग विक्री, शेतकऱ्यांची फसवणूक व जादा दराने खत विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.**

## राज्यसभा पोट निवडणुकीसाठी १८ जूनला मतदान

मुंबई, दि.२३ : राज्यसभा सदस्य सुनेत्रा अजित पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. सुनेत्रा पवार यांनी ६ मे २०२६ रोजी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. या जागेचा कार्यकाळ ७ जुलै २०२८ पर्यंत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, १ जून २०२६ पासून निवडणूक प्रक्रिया सुरू होणार असून १८ जून २०२६ रोजी मतदान आणि त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार ८ जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. ९ जून रोजी अर्जांची छाननी होईल, तर ११ जून ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असेल.

# दहशतवाद ही आता वैश्विक समस्या

केवळ भारतच नव्हे, तर जगातील अनेक देश दहशतवादाच्या समस्येचा सामना करीत आहेत. डिजिटल युगात अफवा पसरवून किंवा जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात बसून दहशतवादी कारवाया करता येऊ शकतात. त्यामुळे दहशतवादाचा मुकाबला एकटादुकटा देश करू शकत नाही. दहशतवाद व त्या माध्यमातून घडवली जाणारी हिंसा ही भारताकरिता जुनी डोकेदुखी आहे. भारताचे माजी पंतप्रधान राजीव यांची २१ मे १९९१ रोजी तमिळनाडूमधील श्रीपेरंबुदूर येथे निवडणूक प्रचारसभेदरम्यान झालेल्या आत्मघाती बॉम्बस्फोटात हत्या करण्यात आली. या घटनेने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता. त्या घटनेनंतर भारत सरकारने समाजात दहशतवाद आणि हिंसाचाराविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी २१ मे हा दिवस 'दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन' म्हणून घोषित केला. ऐंशीच्या दशकापासून देशात दहशतवादाने डोके वर काढले. खलिस्तानवादी चळवळीने पंजाबमध्ये अनेक निरपराध व्यक्तींची हत्या केली. काश्मीरमध्ये वेगवेगळ्या दहशतवादी संघटनांच्या माध्यमातून हिंसाचार घडवण्याची पाकिस्तानची खोड जुनीच आहे. श्रीलंकेतील एलटीटीईने राजीव गांधी यांची हत्या केली, तर खालिस्तानवादी दहशतवादातून इंदिरा गांधी यांना आपण गमावले.

मानवजातीच्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता संघर्ष, युद्धे आणि हिंसा यांचे अनेक संदर्भ आढळतात. प्राचीन काळात भूभाग विस्तारासाठी युद्धे केली जात होती. मध्ययुगात धर्माच्या नावाखाली रक्तपात झाला. आधुनिक युगात राष्ट्रवाद, आर्थिक विषमता, राजकीय स्वार्थ, धार्मिक कट्टरता आणि जातीयवादामुळे हिंसाचाराला खतपाणी मिळाले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने जगाला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेले असले, तरी मानवी मनातील द्वेष, सूडभावना आणि असहिष्णुता पूर्णपणे नाहीशी झालेली नाही. उलट आधुनिक तंत्रज्ञानामुळे दहशतवाद अधिक संघटित, आक्रमक आणि घातक बनला आहे. आज दहशतवादी संघटना इंटरनेट, सोशल मीडिया, आर्थिक नेटवर्क आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांच्या मदतीने जगभरात भयाचे वातावरण निर्माण करत आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ एका देशापुरता मर्यादित प्रश्न राहिलेला नसून संपूर्ण मानवजातीसमोरील गंभीर आव्हान बनला आहे.

दहशतवाद म्हणजे राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा वैचारिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी हिंसा, भीतीचा वापर करणे होय. दहशतवादी संघटना समाजामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी निरपराध नागरिकांना लक्ष्य करतात. बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले, गोळीबार, अपहरण, रेल्वे किंवा विमानांवरील हल्ले, धार्मिक स्थळांवरील आक्रमणे आणि सायबर हल्ले अशा विविध मार्गांनी दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात.

भारत हा विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी नटलेला देश आहे. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य मानले जाते. मात्र, काही विघातक शक्तींनी या विविधतेचा गैरफायदा घेऊन देशामध्ये अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने अनेक दहशतवादी घटनांचा सामना केला आहे. पंजाबमधील अतिरेकी चळवळी, जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, ईशान्य भारतातील फुटीरतावादी कारवाया, नक्षलवाद आणि महानगरांमधील बॉम्बस्फोट अशा अनेक घटनांनी देश हादरून गेला. १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट, २००१ मधील भारतीय संसदेवरील हल्ला, २००८ मधील मुंबईवरील २६/११ चा दहशतवादी हल्ला आणि पुलवामा हल्ला अशा घटनांमध्ये शेकडो निरपराध नागरिक, सैनिक आणि पोलीस शहीद झाले. या घटनांमुळे समाजामध्ये भीती, असुरक्षितता आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले.

दहशतवादाची कारणे अनेक प्रकारची आहेत. गरिबी, बेरोजगारी, अशिक्षितता, सामाजिक अन्याय, धार्मिक कट्टरता, जातीय भेदभाव, राजकीय अस्थिरता आणि परकीय हस्तक्षेप ही दहशतवाद वाढण्याची प्रमुख कारणे मानली जातात. समाजातील काही युवक जेव्हा स्वतःला उपेक्षित समजू लागतात, तेव्हा त्यांच्या मनामध्ये असंतोष निर्माण होतो. काही अतिरेकी संघटना अशा युवकांना आपल्या जाळ्यात ओढतात. धर्म, राष्ट्रवाद किंवा स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांचे ब्रेनवॉश केले जाते. काही वेळा आर्थिक आमिष दाखवूनही युवकांना दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी केले जाते. सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या माध्यमातून अतिरेकी विचारसरणीचा प्रचार मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे युवकांमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादी मूल्ये विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे.

दहशतवादाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही गंभीर परिणाम होतो. एखाद्या मोठ्या हल्ल्यानंतर पर्यटन, उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक यांवर विपरीत परिणाम होतो. सरकारला सुरक्षा व्यवस्थेसाठी प्रचंड खर्च करावा लागतो. विकासकामांसाठी वापरला जाणारा निधी सुरक्षेसाठी खर्च होतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग मंदावतो. दहशतवादी घटनांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिमा प्रभावित होऊ शकते. त्यामुळे दहशतवाद हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून राष्ट्रीय विकासासाठीही मोठे आव्हान आहे. आजच्या डिजिटल युगात सायबर दहशतवाद हे नवे संकट बनले आहे. इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून सरकारी यंत्रणा, बँकिंग व्यवस्था आणि संप्रेषण प्रणालीवर हल्ले केले जाऊ शकतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरवणे, धार्मिक तेढ निर्माण करणे आणि समाजात अस्थिरता निर्माण करणे हे प्रकार वाढले आहेत.

## जनगणना काम प्रगतीपथावर,घर गणना साठी कर्मचारी गल्लीबोळात



रिसोड : शहरात सध्या जनगणना प्रक्रियेला वेग आला असून घर गणनेसाठी नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी आता शहरातील गल्लीबोळात फिरून नागरिकांची माहिती संकलित करताना दिसत आहेत. शासनाच्या निर्देशानुसार घरगुती माहिती, कुटुंबातील सदस्यांची संख्या, राहणीमान, शैक्षणिक स्थिती तसेच इतर आवश्यक बाबींची नोंद केली जात आहे.जनगणना ही देशाच्या विकास आराखड्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते. याच माहितीच्या आधारे विविध शासकीय योजना, निधी वाटप तसेच लोकसंख्येच्या गरजांचा अंदाज घेतला जातो. त्यामुळे नागरिकांनी जनगणना कर्मचाऱ्यांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.शहरातील विविध प्रभागांमध्ये कर्मचारी सकाळपासूनच घराघरात भेट देत असून काही ठिकाणी नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. अनेक ठिकाणी कर्मचारी नागरिकांना स्व-गणना प्रक्रियेबाबतही माहिती देत आहेत. शासनाने जनगणना प्रक्रियेसाठी विशेष प्रशिक्षण देऊन कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे.


ई-निविदा

जाहिरात क्र. १२/२०२६-२७

**वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय**

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, वाशिम**

खोली क्र. ११३, जिल्हाधिकारी कार्यालय, काटा रोड वाशिम ४४४५०५

ई-मेलः- sg_washim@rediffmail.com

जलयुक्त शिवार अभियान-२.० सन २०२६-२७ अंतर्गत वाशिम जिल्ह्यात रिसोड तालुक्यातील पंतापुर गावामध्ये कृत्रिम भूजल पुनर्भरणाच्या रिचार्ज शाफ्ट उपाययोजनांची कामे पात्र आणि अनुभवी कंत्राटदारांकडून करण्याकरिता खुली ई-निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे. निविदेविषयीची सविस्तर माहिती **https://www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१. ई-निविदा विक्री - दि. २१/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून
दि. २८/०५/२०२६ रोजी सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत

२. ई-निविदा पुर्व बैठक - दि. २५/०५/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता

३. ई-निविदा सादर करणे - दि. २१/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत
दि.२८/०५/२०२६ रोजी सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत

४. ई-निविदा उघडणे - दि. २९/०५/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता

स्वाक्षरित/-

**वरिष्ठ भूवैज्ञानिक**
**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, वाशिम**

वि.मा.का./अम. / जाहि./१८७ /२०२६-२०२७


# १० लाखांची वाहन चोरी अवघ्या २ तासांत उघड; आरोपी गजाआड

**रिसोड/ नाजीम खान –**

रिसोड – २५ मे २०२६ रिसोड पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने (DB Team) पुन्हा एकदा आपली तत्परता दाखवत एका मोठ्या वाहन चोरीचा गुन्हा अवघ्या २ तासांत उघडकीस आणला आहे. बसस्थानक परिसराबाहेरून चोरीला गेलेली १० लाख रुपये किमतीची १७ आसनी ट्रॅव्हलर गाडी जप्त करून पोलिसांनी २२ वर्षीय आरोपीला अटक केली आहे. पोलिसांच्या या सुपरफास्ट कामगिरीमुळे फिर्यादीसह शहरवासीयांकडून रिसोड पोलिसांचे मोठे कौतुक होत आहे.

**गॅरेजच्या समोरून झाली होती चोरी**

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी मोहम्मद तस्लीम मोहम्मद कादीर (वय ४५ वर्ष, रा. गायबीपुरा, रिसोड) यांच्या मालकीची फोर्स कंपनीची पांढऱ्या रंगाची १७ आसनी गाडी (क्र. MH 12 HB 2929, किंमत १० लाख रुपये) आहे. २३ मे रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास त्यांनी आपली गाडी नेहमीप्रमाणे रिसोड बसस्थानकासमोरील टाटा महिंद्रा गॅरेजच्या बाजूला उभी केली होती. मात्र, २४ मे रोजी सकाळी ७ वाजताच्या सुमारास जेव्हा ते गॅरेजवर आले, तेव्हा त्यांना आपली गाडी जाग्यावर दिसली नाही.




कोणीतरी अज्ञात चोरट्याने ती चोरून नेल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) च्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल केला.

**सीसीटीव्ही आणि तांत्रिक तपासाच्या जोरावर पकडले**

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून रिसोड पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्री. रामेश्वर चव्हाण यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकाला (इ ढशरा) तपासाचे चक्र फिरवण्याचे आदेश दिले.पथकाने वेळ न घालवता परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि आपल्या गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास सुरू केला. अवघ्या दोन तासांत संशयावरून आशुतोष लक्ष्मण अकाले (वय २२ वर्षे, रा. काळे फाईल, तालुका वाशीम) याला वाशीम नाका, रिसोड येथून ताब्यात घेण्यात आले.त्याची कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून चोरीला गेलेली १० लाख रुपये किमतीची फोर्स गाडी जप्त केली आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि पथकाची कामगिरी**

सदरची उल्लेखनीय कामगिरी वाशीम जिल्ह्याचे माननीय पोलीस अधीक्षक श्री. निकेश खाटमोड-पाटील (IPS), माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती लता फड, माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. नवदीप अग्रवाल (IPS) यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक श्री. रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वात पार पडली. या धडक कारवाईत पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, रामेश्वर नागरे, पोलीस कॉन्स्टेबल प्रशांत राजगुरु, पोलीस अंमलदार विनोद घनवट, परमेश्वर भोणे, रवी अधगले आणि राजेश गंगवे यांच्या गुन्हे शोध पथकाने (DB Team) महत्त्वाची भूमिका बजावली.उदरनिर्वाहाचे साधन असलेली गाडी चोरीला गेल्याने फिर्यादी मोहम्मद तस्लीम हवालदील झाले होते.

मात्र, रिसोड पोलिसांनी अवघ्या काही तासांतच आरोपीला अटक करून वाहन सुखरूप परत मिळवून दिल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू तरळले. त्यांनी रिसोड पोलिसांचे जाहीर आभार मानले असून सर्व स्तरांतून पोलिसांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


**पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720**

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# खरिपावर अनिश्चिततेचे सावट

## आर्थिक मदत देण्याची मागणी

■ आखाती युद्धाचा सर्वाधिक फटका कृषी क्षेत्राला बसला आहे. यंदा खरीप हंगामाला फटका बसल्यास दूरगामी परिणाम होणार आहेत. खरीप हंगामात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी इंधनाचा सुरळीत पुरवठा, कृषी निविष्ठांच्या दरांवर नियंत्रण आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी विविध शेतकरी संघटनांकडून करण्यात येत आहे. अन्यथा यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी अधिक आव्हानात्मक ठरण्याची भीती अनुभवी शेतकऱ्यासह कृषितज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

रिसोड, ता. २३ : हवामान विभागाचा अंदाज, खासगी हवामानतज्ज्ञाचे अंदाज, आखाती युद्धामुळे झालेला इंधनाचा तुटवडा, कृषी निविष्ठांचे वाढलेले दर, ग्रामीण भागात निर्माण झालेली अस्थिर परिस्थिती इत्यादी कारणामुळे खरीप हंगामावर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले असून शेतकरी धास्तावला आहे.

आगामी खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांपुढे अनेक अडचणी उभ्या ठाकल्या आहेत. परिणामी ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर्षी हवामान विभागाने तसेच खासगी हवामानतज्ज्ञाने पावसाळ्याबद्दल अनिश्चितता वर्तविली आहे. त्याचा काहीसा प्रत्यय जाणवत आहे.

मेच्या शेवटी खासगी हवामानतज्ज्ञाने अवकाळी पाऊस पडणार असल्याचे वर्तविले होते. परंतु, त्या उलट तापमानामध्ये दुपटीने वाढ झाली आहे. मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले शेतकरी अजून, पूर्वपदावर आलेले नाहीत. दुसरीकडे इंधनटंचाई, वाढती महागाई आणि कृषी निविष्ठांच्या वाढलेल्या किमतींमुळे सुलतानी संकट अधिक तीव्र झाले आहे. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामाबाबत शेतकरी धास्तावलेला दिसून येत आहे. खरीप मशागतीच्या कामांना गती आली आहे. मात्र, डिझेलच्या तुटवड्यामुळे ट्रॅक्टर व कृषी यंत्रांच्या वापरावर परिणाम होत आहे.



डिझेल वेळेवर उपलब्ध होत नसून वाढीव दराने मिळत असल्याने मशागतीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. याशिवाय सोयाबीन बियाण्यासह इतर बियाणे, खते, कीडनाशके आणि इतर कृषी निविष्ठांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. त्यामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली असून, शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. गत काही वर्षांपासून हवामानातील बदलामुळे पावसाचा अंदाज बांधणे कठीण झाले आहे.

पेरणीनंतर पाऊस खंडित होणे किंवा अतिवृष्टी होऊन पिकांचे नुकसान होण्याच्या घटना वाढल्या आहेत त्यामुळे मागील काही वर्षापासून शेती ही तोट्याचा सौदा ठरत आहे.

शेतकऱ्यांना शासनाकडून सावत्रपणाची वागणूक मिळत आहे सावध भूमिका घेऊनही शेतकरी आसमानी बरोबरच सुलतानी संकटाच्या समोर हतबल झाला आहे.

# शेतमाल दरातील चढ उतारामुळे शेतकरी संतप्त

रिसोडः शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेला कापूस, तूर आणि सोयाबीन विक्रीसाठी बाजारात आणला तेव्हा त्यांना कवडीमोल भाव मिळाला. मात्र, शेतकऱ्यांकडील माल संपताच कापूस १० हजार रुपये तर सोयाबीन ७हजार रुपयांच्या घरात पोहोचल्याने शासनाचे धोरण नेमके शेतकऱ्यांच्या हिताचे आहे की व्यापाऱ्यांच्या, असा संतप्त सवाल रिसोड तालुक्यातील शेतकरी उपस्थित करू लागले आहेत.

यंदाच्या हंगामात शेतकऱ्यांना निसर्गाच्या लहरीपणासोबतच बाजारभावाचाही मोठा बाजारात माल येताच दर पाडण्याचे सत्र सुरू झाले होते. हंगामात सोयाबीनला अवघा ३५०० ते ४ हजार रुपये भाव मिळाला, तर कापसाचे दर ६ ते ७ हजार रुपयांपर्यंतच मर्यादित राहिले.

कर्जफेड, शेतीखर्च आणि घरखर्च भागवण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण माल कमी दरात विकून टाकला. आता मात्र कापूस



१० हजार रुपये प्रतिक्विंटल तर सोयाबीन ७ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल दराने विकले जात आहे. त्यामुळे रात्रंदिवस मेहनत करून पीक घेणारा शेतकरी तोट्यात आणि व्यापारी मात्र मालामाल अशी भावना शेतकऱ्यांमध्ये तीव्र होत आहे. शेतमालाचे भाव हंगामाच्या सुरुवातीलाच का वाढवले जात नाहीत ? व्यापाऱ्यांच्या गोदामात माल जमा झाल्यानंतरच बाजारात तेजी का येते?, असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. शासन आणि व्यापाऱ्यांच्या संगनमतामुळेच दर पाडले जात असल्याचा आरोपही केला जात आहे. या परिस्थितीमुळे संताप निर्माण झाला आहे. श. प्र.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर रिसोडात घंटानाद आंदोलन

**रिसोड** : तालुक्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याच्या निषेधार्थ क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने २५ मे रोजी तहसील कार्यालय परिसरात घंटानाद आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.



तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्याशी चर्चा करताना पदाधिकारी व कार्यकर्ते.

जलजीवन मिशन अंतर्गत तालुक्यातील गावांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा करावा, सन २०२६ चा पीक विमा तत्काळ मंजूर करावा, तसेच खताचा कृत्रिम तुटवडा होऊ नये यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, पोकरा योजनेत घोटा, हराळ, चिखली, व्याड व कवठा गावांचा समावेश करावा, कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांना लिलाव पट्टी उपलब्ध करून द्यावी, आणि सोलर कंपनीकडून प्रलंबित सोलर पंप तातडीने बसवावेत, अशी मागणी करण्यात आली. घरकुल लाभार्थ्यांना शासनाने जाहीर केलेली मोफत पाच ब्रास रेती द्यावी, शेतीकामांसाठी डिझेल उपलब्ध करून द्यावे तसेच खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर डीएपी खताचा पुरेसा साठा उपलब्ध करून बफर स्टॉक रिलीज करावा, अशी मागणीही करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे पाटील, युवा जिल्हाध्यक्ष सतीश इढोळे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष सोनू मुळे, जिल्हा उपाध्यक्ष गजानन पैठणकर, तालुकाध्यक्ष तुकाराम बोडखे, मंगेश सरनाईक, अशोक पांडे, गजानन गायकवाड, अमोल मगर आदींची उपस्थिती होती. शेतकरी व नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला.

### अनुदान जमा करावे!

पंचायत समितीमार्फत घरकुल, विहीर, फळबाग, गोठा यांसारख्या योजनांचे रखडलेले अनुदान तातडीने जमा करावे तसेच पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांची होत असलेली कथित आर्थिक लूट थांबवावी.

**तसेच खत विक्रीतील अनियमितता रोखण्यासाठी कृषी केंद्रांची तपासणी करून लिंकिंग विक्री, शेतकऱ्यांची फसवणूक व जादा दराने खत विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.**

# जिल्ह्यात हळद लागवडीला आला वेग

## कृषी अर्थव्यवस्थेला चालना

■ कृषी विभागाने मात्र शेतकऱ्यांना हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन लागवडीचे नियोजन करण्याचे आवाहन केले आहे. ज्या शेतकऱ्याकडे सिंचनाची अपुरी सुविधा आहे, अशा शेतकऱ्यांनी सुद्धा लागवड न करण्याचे सांगितले आहे. हळदी हमखास उत्पन्न देणारे पीक असल्यामुळे तसेच हळदीच्या वाढत्या लागवडीमुळे यंदाच्या खरीप हंगामात जिल्ह्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केल्या जात आहे.



रिसोड, ता. २४ : तालुक्यासह जिल्ह्यात हळद लागवडीच्या कामांना वेग आला असून, यंदा तालुक्यात आठ हजार हेक्टरच्या वर लागवड होणार असल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे. हवामान विभागाने मॉन्सूनबाबत विविध अंदाज वर्तविले असले, तरी अनेक शेतकरी त्याकडे फारसे लक्ष न देता हळद लागवडीची तयारी करीत आहेत.

जिल्ह्यातील रिसोड, मालेगाव, कारंजा, मंगरुळपीर वाशीम या भागामध्ये काही शेतकऱ्यांनी हळद लागवडीची कामे सुरू झाली आहेत. मागील काही वर्षांत हळदीला मिळालेला चांगला बाजारभाव, उत्पादनाला असलेली मागणी आणि इतर पारंपरिक पिकांच्या तुलनेत हमखास उत्पादन देणारे पीक असल्यामुळे शेतकऱ्यांचा कल हळद लागवडीकडे वाढला आहे. परिणामी यंदा हळदीखालील क्षेत्रात वाढ होण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहेत.

वाढते तापमान, हवामानातील अनिश्चितता, अवकाळी पावसाचा धोका आणि पर्जन्यमानाबाबतचे अंदाज याकडे दुर्लक्ष करून अनेक शेतकरी लागवडीसाठी बियाणे, खतांची खरेदी, मशागतीची कामे पूर्ण करूत लागवडीला सुरुवात करत आहेत. काही ठिकाणी ठिबक सिंचनाच्या सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनी लागवड सुरू केली असून, पाण्याचे योग्य नियोजन करण्यावर भर दिला जात आहे.

# रिसोड नगर परिषदेच्या वार्षिक निविदा वादाच्या भोवऱ्यात

## निविदा रद्द करण्याची जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी

**रिसोड** - येथील नगर परिषदेच्या वार्षिक निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करून निविदा रद्द करण्याची मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे अध्यक्ष तथा पत्रकार प्रभाकर पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे एका निवेदनाद्वारे केली असल्यामुळे रिसोड नगर परिषदेच्या वार्षिक निविदा ( टेंडर ) वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

निवेदना मध्ये नमूद करण्यात आले आहे की,रिसोड नगर परिषदेच्या सन २०२६-२७ च्या वार्षिक निविदा प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची माहिती दोन वेळा काढण्यात (प्रसारित)आलेल्या निविदेवरून व दि. २१ मे रोजी उघडण्यात आलेल्या निविदा वरून समोर आली आहे, दैनंदिन खप असलेल्या वृत्तपत्रांमध्ये निविदा प्रसारित करण्यात आल्या नाहीत, निविदा सीलबंद डब्यामध्ये स्वीकारण्यात आल्या नाहीत, मोजक्याच नगरसेवकांना बोलावून कार्यालयीन वेळेच्या नंतर निविदा उघडण्यात आल्या, पुरवठादारांना बोलावण्यात आले नाही, त्यामुळे मुख्याधिकारी यांनी नियम व अटींचे उल्लंघन करून काही नगर सेवक तसेच त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने निविदा मंजूर केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. नगरसेवक हे लोकप्रतिनिधी असून त्यांनी स्वतः अथवा त्यांच्या निकटवर्तीयांच्या माध्यमातून नगर परिषदेची कंत्राटे घेणे हे हितसंबंधांचा संघर्ष निर्माण करणारे आहे. यामुळे निविदा प्रक्रियेची पारदर्शकता व निष्पक्षता बाधित झाली असून इतर पात्र ठेकेदारांवर अन्याय झाला आहे. नगरसेवकांनी स्वतःच्या किंवा नातेवाईकांच्या नावे निविदा घेतल्या असल्याचे उघड झाले असून त्यास मुख्याधिकारी यांनी मान्यता दिली असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम महाराष्ट्र सार्वजनिक खरेदी नियमावली व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदीची उल्लंघन झाले आहे सदर प्रकरणात निविदा अटी, पात्रता निकष व मंजुरी प्रक्रिया यांची सखोल चौकशी करून सदर वार्षिक निविदा रद्द करण्यात याव्यात अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे तसेच संपूर्ण निविदा प्रक्रियेची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.निविदा प्राप्त करणाऱ्या नगरसेवक व त्यांच्या नातेवाईकांची माहिती सार्वजनिक करण्यात यावी. नियमभंग झाल्याचे आढळल्यास संबंधित मुख्याधिकारी, अधिकारी व लाभार्थींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. आवश्यक असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग व लेखापरीक्षण यंत्रणेमार्फत विशेष चौकशी करण्यात यावी. अशीही मागणी पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे काल दिनांक २५मे रोजी केली आहे. सदर निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम, विभागीय आयुक्त, अमरावती . संचालक, नगर प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य. मुंबई यांना पाठविण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी काय कार्यवाही करतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जुन्या वाहनांना एचएसआरपी बसविण्यासाठी ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ

**मुंबई, दि. २१ : राज्यातील दिनांक १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) पाटी बसविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ दिली आहे. यापूर्वी ही मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत होती. मात्र, राज्यातील केवळ ५० टक्के जुन्या वाहनांवरच एचएसआरपी बसविण्यात आल्याचे आढळून आल्याने शासनाने ही मुदत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.**

परिवहन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ज्या वाहन मालकांनी निर्धारित मुदतीत एचएसआरपी बसविणार नाही किंवा त्यासाठी आगाऊ वेळ (अपॉइंटमेंट) घेणार नाहीत, अशा वाहनांची १ जुलै २०२६ पासून रस्त्यावर तपासणी करण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांकडून मोटार वाहन कायदा व नियमांनुसार एक हजार रुपये तडजोड शुल्क आकारण्यात येणार आहे. वाहन मालकांनी एचएसआरपी बसविण्यासाठी परिवहन विभागाच्या http://transport.maharashtra. gov.in?utm_source=chatgpt.com या संकेतस्थळावर जाऊन ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाईन अपॉइंटमेंट घ्यावी, असे आवाहन सह परिवहन आयुक्त (संगणक) शैलेश कामत यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## आ. गवळी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना पाणी बॉटल भेट



रिसोड--अपराजित खासदार तथा विधान परिषद आमदार भावनाताई गवळी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना स्टीलचे पाणी बॉटल चे वाटप करण्यात आले भावनाताई गवळी यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर आयोजित या कार्यक्रमांमध्ये भावना पब्लिक स्कूल तसेच कॅल्शियम इंग्लिश स्कूलचे जवळपास साडेचारशे विद्यार्थ्यांना स्टील च्या पाणी बॉटल वाटण्यात आल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना चांगले पाणी मिळावे यासाठी विद्यार्थी हे या पाणी बॉटलमध्ये शुद्ध पाणी आणणार असल्यामुळे आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त असे ठरणार आहे यावेळी मंचावर आमदार भावनाताई गवळी यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर, मार्केट कमिटीचे माजी सभापती तथा संचालक गजानन पाचरणे, साधनाताई गवळी,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी उपाध्यक्ष वामनराव देशमुख नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर, माजी प्राचार्य विजय तुरुकमाने,डॉक्टर विजय प्रसाद तिवारी, मच्छिंद्र ढोणे यांचे सह गणमान्य मंडळी उपस्थित होती यावेळी मार्गदर्शन करताना भावनाताई गवळी यांनी विद्यार्थी हे देशाचे आधारस्तंभ असून त्यांना निरोगी आयुष्य व चांगले शिक्षण देण्याचा भावना पब्लिक स्कूल व लायसियम स्कूलचा उद्देश असून अनेक विद्यार्थी या संस्थेतून शिक्षण घेऊन चांगल्या पदावर कार्य करत आहेत ही शाळेसाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चाफेश्वर गांगवे यांनी केले(वि. प्र)

# रिसोड पोलीस स्टेशनमध्ये शिवाजी शाळेतील एन.सी.सी. विद्यार्थ्यांना शस्त्राबद्दल माहिती

**रिसोड /नाजीम खान –**

एन.सी.सी.(NCC) विद्यार्थ्यांना स्थानिक रिसोड पोलीस स्टेशनमध्ये शस्त्रास्त्रांविषयी (Weapons Training) माहिती रिसोड पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री रामेश्वर चव्हाण व त्यांचे सहकारी यांनी श्री शिवाजी विद्यालय रिसोड येथील एन. सी.सी.कॅटेट यांना देण्यात आली.असे उपक्रम सामान्यतः पोलीस स्टेशन व्हिजिट किंवा समुदाय पोलीसिंग (Community Policing) कार्यक्रमांचा भाग असतात. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना खालील गोष्टींची माहिती देण्यात आली. त्यांमध्ये शस्त्रांची ओळख २२ रायफल, ७.६२ mm SLR, AK-४७, आणि पिस्तूल यांसारखी आधुनिक शस्त्रे कशी



हाताळावीत.शस्त्रांची कार्यपद्धती ,बंदुकीची रचना, तिचे भाग (Assembly and disassembly), आणि गोळीबार कसा करावा याबद्दलचे प्रात्यक्षिक तसेच शस्त्रास्त्रांच्या वापरादरम्यान घ्यावयाच्या सुरक्षेच्या नियमांची माहिती व पोलीस कार्यप्रणाली गुन्हे अन्वेषण आणि रहदारी नियंत्रण (Traffic Control) याबद्दलची माहिती देण्यात आली. या उपक्रमादरम्यान विद्यालयाचे प्राचार्य श्री संजय देशमुख एन सी सी टी ओ प्राध्यापक अभिजीत देशमुख विद्यालयाचे कर्मचारी श्री दर्शन सरनाईक व श्री विलास सरनाईक यांची उपस्थिती होती. या उपक्रमाबद्दल प्राचार्य श्री संजय देशमुख यांनी संस्थेच्या वतीने श्री रामेश्वर चव्हाण पोलीस निरीक्षक रिसोड यांचे आभार मानले.

# जैन साधू-संतांच्या सुरक्षेसाठी जैन समाज आक्रमक

## आर्यिका माताजी दुर्घटना प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी

**रिसोड /नाजीम खान**

रिसोड : जैन साधू-संतांच्या सुरक्षेसाठी विशेष सुरक्षा व्यवस्था लागू करावी, राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण तयार करावे तसेच मध्य प्रदेशातील आर्यिका माताजी दुर्घटना प्रकरणाची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी रिसोड येथील जैन समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात दिनांक २५ मे रोजी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना निवेदन सादर करण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले की, दिनांक २० मे २०२६ रोजी मध्य प्रदेशातील रीवा जिल्हा मुख्यालयातील कलेक्ट्रेट भवनासमोर राष्ट्रसंत आचार्य श्री १०८ विद्यासागर जी महाराज यांच्या शिष्या आर्यिका श्री १०५ श्रुतमती माताजी व आर्यिका श्री १०५ उपशममती माताजी या विहार करत असताना अत्यंत दुर्दैवी घटना घडली. या घटनेत संघातील





पूज्य आर्यिकांचे अकाली निधन झाले असून संपूर्ण जैन समाजात शोककळा पसरली आहे.ही घटना केवळ सामान्य रस्ते अपघात नसून उपलब्ध तथ्ये आणि व्हिडिओ क्लिप्सच्या आधारे समाजामध्ये गंभीर शंका व चिंतेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष, पारदर्शक व उच्चस्तरीय चौकशी करून सत्य समोर आणावे, अशी मागणी करण्यात आली आहे.जैन साधू-संत हे पूर्णतः निःशस्त्र, अहिंसक व पायी विहार करणारे तपस्वी असतात.

ते कोणत्याही प्रकारच्या सुरक्षा सुविधा न स्वीकारता समाजामध्ये शांतता, संयम आणि अहिंसेचा संदेश देत असतात. मात्र अलीकडील काळात साधू-संतांवरील वाढत्या अपघात व हल्ल्यांच्या घटनांमुळे समाजामध्ये संतांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता व्यक्त होत आहे.या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य शासनाने जैन साधू-संतांच्या सुरक्षेसाठी विशेष धोरण राबवून विहार मार्गांवर आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.निवेदन देताना मोतिसेठ पंचवाटकर, किशोर महाजन, संदीप कुरकुटे, विनित पंचवाटकर, जितेंद्र हरावत, नितीन झरपलहवाटकर, गणेश देगावकर, चंद्रकुमार लवंडे, बाहुबली सराफ, देवेंद्र जोगी, सचिन सराफ, विलास जोगी, सागर काळे, कुलभूषण बेलोकर, अक्षय जोगी, महावीर संघई, जिनेंद्र शेंडे, चिन्मय लवंडे आदी उपस्थित होते.

## तुळजा भवानी माता रतनगड संस्थान येथे जागतिक जैव विविधता दिन उत्साहात साजरा



**मालेगाव :** तुळजा भवानी माता रतनगड संस्थान येथे जागतिक जैव विविधता दिनानिमित्त मुख्य प्राण्यांसाठी पाण्याचे हौद व पान टोपल्या लावण्याचा उपक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन व वन्यजीव संरक्षणाचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे पक्षी व वन्य प्राण्यांना पाण्याची मोठी टंचाई भासत असल्याने त्यांच्यासाठी विविध ठिकाणी पाण्याचे हौद तसेच पान टोपल्या ठेवण्यात आल्या.

या उपक्रमाचे आयोजन परमपूज्य श्री. गोपाल महाराज रतनगड यांच्या प्रेरणेने करण्यात आले. अखिल शानिक शैळके, विनोद बांगर, जलमित्र तसेच पक्षीप्रेमी रिसोड येथील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. उपस्थितांनी जैव विविधतेचे महत्त्व सांगत प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसरात पक्षी व प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करावी, असे आवाहन केले.

उपक्रमामुळे परिसरात पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण झाली असून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले. नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यात अशा उपक्रमांना अधिक पाठिंबा देण्याची ग्वाही दिली.श.प्र.

# रिसोड शहरात अवैध गौण खनिज उत्खननाला ऊत

रिसोड: शहर व परिसरात सध्या विविध बांधकामे आणि विकासकामे मोठ्या प्रमाणावर सुरु असून या कामांसाठी लागणाऱ्या गौण खनिजांचा वापर वाढला आहे. मात्र या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर शहरासह ग्रामीण भागात अवैध मुरुम उत्खनन आणि रेती वाहतुकीचे प्रकार मोठ्याप्रमाणात सुरुअसल्याचे चित्र दिसून येत आहे.

माहितीनुसार, अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळी ट्रॅक्टर आणि जेसीबीच्या सहाय्याने मुरुमाचे उत्खनन केले जात असून कोणतीही अधिकृत परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर गौण खनिजांची

रिसोड परिसरात अवैध मुरूम उत्खनन व रेती वाहतुकीच्या तक्रारी गंभीरपणे घेतल्या जात आहेत. विना रॉयल्टी गौण खनिज वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर, जेसीबी तसेच इतर वाहनांवर महसूल विभाग कडून कठोर कारवाई करण्यात येईल. संबंधित वाहन जप्त करून दंडात्मक कार्यवाही केली जाईल. नागरिकांनी अवैध उत्खनन अथवा वाहतुकीबद्दल माहिती प्रशासनाला द्यावी. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कोणतीही सूट दिली जाणार नाही.

प्रती आ तेजनकर
तहसीलदार, रिसोड

वाहतूक केली जात आहे. तसेच नदीपात्रातून रेती उपसा करून तिची अवैधरीत्या शहरात वाहतूक होत असल्याचीही चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे.

या अवैध उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत असून पर्यावरणाचा समतोलही धोक्यात येत आहे. रस्त्यांची दुरवस्था, धूळ प्रदूषण आणि अपघातांचा धोका वाढल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

संबंधित महसूल विभाग व प्रशासनाने तातडीने कारवाई करून अवैध उत्खनन व रेती वाहतुकीवर नियंत्रण आणावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.श.प्र.

